सेवाप्रवेश नियम

पदोन्नतीसाठी पूर्वअट म्हणून निम्न संवर्गात किमान सेवेसंबधीची अट परिविक्षाधीन कालावधीतील सेवा अनुभवासाठी ग्राहय धरण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय,क्र.एसआरव्ही-१०९१/प्र.क्र.१/९१/बारा,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २३ मे,१९९४.

पहा:- १) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही-१०८८/१०९/१२,दि.२५ ऑगस्ट,१९८८.
२) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही-१०८८/१०९/१२,दि.३१ मे ,१९८९.
३) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही-१०८८/१०९/प्र.क्र.१/८८/१२, दि.४-९-१९९०.
४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे क्र.७३ (अे)(७)/९८९/दोन, दि.२५-१-९४ चे पत्र.

शासन निर्णय :-

शासन सेवेतील वर्ग-३ (आता गट क) मधील वरिष्ठ पदावर वर्ग-२ (गट ब) मधील वरिष्ठ पदावर आणि वर्ग-१ (गट अ) मधील दुसऱ्या पदोन्नतीच्या पदांपर्यन्त पदोन्नती करताना निम्न पदावर ३ वर्षे नियमित सेवेच्या अनुभवाची अट विहित केली आहे. उपरोक्त क्र.(३) येथे दर्शलिेल्या परिपत्रकानुसार परिविक्षाधीन काळातील सेवेचा कालावधी पदोन्नतीसाठीच्या अनुभव कालावधीच्या गणतीसाठी नियमित सेवा कालावधी म्हणून ग्राहय समजण्यात यावा किंवा कसे याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. या प्रश्नाबाबत सर्वकष तपासणी केल्यानंतर असा निष्कर्ष आहे की, परिविक्षा कालावधी हा उमेदवार ज्या सेवेत प्रविष्ठ झालेला आहे त्या सेवेंअंतर्गत प्रशिक्षणाचा कालावधी म्हणून समजण्यात येतो. या कालावधीमध्ये अशा उमेदवारांना संबंधित पदांच्या कामकाजाचे ज्ञान,त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या समजावून घेणे अपेक्षित असते. तसेच त्यास विहित केलेल्या विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा कालावधीतील नेमणूक अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही. तेव्हा शासनाचे असे आदेश आहेत की, ज्या अधिकाऱ्यांची नेमणूक परिविक्षाधीन कालावधीतील आहे. त्यांच्या बाबतीत परिविक्षाधीन कालावधी पूर्ण केल्यानंतरच त्यांचा पदोन्नतीसाठी विचार करण्यात यावा. जोपर्यन्त त्यांची नियुक्ती परिविक्षाधीन तत्वावर दोन वर्षे किंवा वाढीव कालावधीकरिता चालू राहिलेली असेल तो कालावधी पदोन्नतीसाठी निश्चित केलेल्या अनुभव कालावधीसाठी ग्राहय धरण्यात येऊ नये. परिविक्षाधीन कालावधी समाप्त केल्यानंतर त्या तारखेपासून पदोन्नतीसाठी अनुभव कालावधी गणण्यात यावा. या नेमणूकीच्या दिनांकापासून सेवाप्रवेश नियमानुसार विहित केलेला अथवा वर (क्र.१) येथील परिपत्रकात नमूद केलेला आवश्यक कालावधी पूर्ण होईपर्यन्त संबंधित अधिकारी वरच्या पदावरील पदोन्नतीसाठी पात्र समजण्यात येऊ नये.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही/-

( य. मा. जोशी )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

G:\gr223-5-1994